## प्रेस नोट

**पुणे शहरातील रेकॉर्ड वरील तडीपार असलेला व शिक्षा झालेल्या गुन्हेगाराने आठ वर्षा पुर्वी केलेले दोन निर्घुन खून संघटित गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर प्रा.वि. गुन्हे शाखा, पुणे यांनी उघडकीस आणुन तीन आरोपींना अटक केले.**

दि. ०२/०२/२०१८ रोजी संघटित गुन्हेगारी विरोधी पथक उत्तर प्रा.विभाग गुन्हे शाखा, पुणे शहर पोलीस निरीक्षक श्री. ब्रम्हानंद नाईकवाडी पोलीस स्टाफसह हिंजवडी पोलीस स्टेशनचे हददीत पेट्रोलिंग फिरताना पोहवा रमेश भिसे यांना मिळालेल्या बातमी वरुन रेकॉर्ड वरील गुन्हेगार सुनिल आण्णा कांबळे वय ३० वर्षे रा. नेरे, दत्तवाडी, ता. मुळशी, जि. पुणे यास पुणे शहर व जिल्हयातुन एक वर्षाकरीता तडीपार केलेले असताना सुध्दा तो त्या आदेशाचा भंग करुन नेरे, दत्तवाडी येथे रचलेल्या सापळयात मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याचे विरुध्द हिंजवडी पो.स्टे.गुरनं. ७१/२०१८ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

सुनिल कांबळे हा घरफोडी, वाहनचोरी व इतर माला विरुध्द्च्या गंभीर गुन्हयामधील रेकॉर्ड वरील शिक्षा भोगलेला गुन्हेगार असल्याने त्याचेकडे तपास करता **जुलै सन २०११ मध्ये त्याने त्याचा साडु संभाजी ऊर्फ पिंटया आनंदा गोठे रा. लवळे, ता. मुळशी जि. पुणे याने त्याची पत्नी रोहीनी हि दत्तवाडी, नेरे येथील सासुरवाडीच्या घरात झोपलेली असताना रात्रीच्या वेळी तिच्या आंथरुणात घुसून तिची छेडछाड काढल्याच्या कारणा वरुन चिडुन जाऊन रागापोटी त्यास गोड बोलुन दारुची पार्टी देतो असे सांगुन त्यास त्याचे मित्र १) सनी ऊर्फ रामचंद्र राजु जाधव वय ३१ वर्षे, रा. नेरे, दत्तवाडी, ता. मुळशी, जि. पुणे २) गणेश ऊर्फ पप्पु रामचंद्र डामसे वय २९ वर्षे, रा. कोटमदरा, ता. आंबेगाव, जि. पुणे ३) राजु यादव रा. चाकण पुर्ण नाव पत्ता माहित नाही यांनी मिळुन सुनिल कांबळेच्या मारुती ८०० कार मधुन बसवुन मंचर ते भिमाशंकर ता. आंबेगाव, जि. पुणे येथील पोखरी घाटात नेऊन त्यास सर्वांनी मिळुन पिंटु गोठे यास हाताबुक्यांनी व तेथील झाडाच्या लाकडांनी बेदम मारहाण करुन त्याचा खून करुन त्याची बॉडी तेथेच दरीत फेकुन दिली.**

पिंटु गोठे याचा खून सुनिल कांबळेनेच केल्याचा संशय त्याची आई कांताबाई आनंदा गोठे वय ५५ वर्षे, रा. लवळे, ता.मुळशी, जि. पुणे हिस आल्याने त्याबाबत तिने सुनिल कांबळे याचे कडे विचारना करुन त्याचे विरुध्द् पोलीसांकडे तक्रार करते असे म्हणाल्याने पोलीसात तक्रार केल्यावर आपण पकडले जाऊ या भिती पोटी **पिंटु गोठे याचे खूनाच्या चार ते पाच दिवसा नंतर सुनिल कांबळे व त्याचे वर नमुद मित्रांनी कांताबाई गोठे हिस पिंटयाला शोधण्यास जाऊ असे गोड बोलुन तिला वर नमुद कारमध्ये बसवुन दुधावरी खिंडघाट, लोणावळा येथे नेवुन चौघांनी मिळुन तिचे हातपाय धरुन तोंड व गळा दाबुन तिचा खून करुन तिची बॉडी दुधावरी खिंडघाटातील झाडाझुडपात टाकुन दिली आहे.** असे सांगुन त्याने दोन्ही खून केल्याचे कबुल करुन व त्यांच्या बॉडी टाकुन दिल्याचे ठिकाणे दाखविली त्याबाबत घोडेगाव, लोणावळा पो. स्टे. येथे त्यांचे मृत्यू बाबतच्या नोंदी पाहता **घोडेगाव पो.स्टे. येथे पिंटु गोठे याचे इसमाचे वर्णनाचे अ.मयत रजि.नं. १९/२०११ सीआरपीसी १७४ प्रमाणे दि. १६/०७/२०११ रोजी मयत दाखल** असल्याने सदर मयत इसमाचे वर्णन व त्याचे अंगावर असणाऱ्या वस्तुंबाबत मयताची पत्नी व इतर नातेवाईक यांचे कडे विचारणा करता त्यांनी ते वर्णन व अंगावरील वस्तु वरुन तो मयत इसम हा संभाजी ऊर्फ पिंटु गोठे याचेचे असल्याचे व तो वर सन २०११ पासुनच घरी नसल्याचे खात्रीपुर्वक सांगितले. पती व सासु कांताबाई असे दोघेही सन २०११ साला पासुन घरी नसल्याचे सांगितले व सदर खूनांबाबत सदरचे नातेवाईकांनाही समजले होते परंतु सुनिल कांबळे याने त्यांना त्याबाबत कोठेही वाच्यता करु नका नाहीतर त्या दोघांप्रमाणे तुमचाही काटा काढीन अशी धमकी दिल्याने व सुनिल कांबळे हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा व दहशत असल्याने त्याचे विरुध्द नातेवाईकांनी आज पर्यंत कोठेही तक्रार दिलेली नाही. नमुद प्रमाणे खुन उघडकीस आल्याने त्याबाबत पोलीस उप निरीक्षक पोपटराव गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **घोडेगाव पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे गुरनं. ३७/२०१८ भा.दवि. ३०२,२०१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल** करण्यात आला असुन आरोपींना पुढील तपास कामी घोडेगाव पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.व मयत स्त्रीचे मयत बॉडीचा शोध चालु आहे.

सुनिल कांबळे याचे विरुध्द पुणे शहर व ग्रामिण हददीमध्ये ९ घरफोडी, वाहनचोरी, शरीरा विरुध्द व इतर गंभीर गुन्हयाचे नोंद असुन त्यास काही गुन्हया मध्ये मा. न्यायालयातुन शिक्षा झालेली आहे. सध्या तो तडीपार गुन्हयात जेल मध्ये आहे. सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त,गुन्हे श्री. पंकज डाहणे, मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. संजय निकम, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी, सहा पोनि गणेश पवार, पोउप निरीक्षक पोपटराव गायकवाड, कर्मचारी रमेश भिसे, राजनारायण देशमुख, भालचंद्र बोरकर, दिपक भुजबळ, प्रदीप शेलार, किरन चोरगे, अतुल मेंगे, दत्तात्रय फुलसंदर, नरेंद्र सोनवणे, कांतीलाल बनसुडे, तानाजी गाडे, नवनाथ चांदणे, निलेश शिवतरे, शितल शिंदे यांनी केली आहे.

